भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

ZW 087081

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐

मराठी विभाग

मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले.

तालुका : हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर ४१६१०९

आणि

मराठी विभाग

श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय,इचलकरंजी.

तालुका : हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर ४१६११५

या महाविद्यालातील मराठी विभागाचा

सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING(MOU)

CamScanner

मराठी विभाग

## मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले.

तालुका : हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर ४१६१०९

## आणि

मराठी विभाग

## श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय,इचलकरंजी.

तालुका : हातकणंगले, जिल्हा : कोल्हापूर ४१६११५

## या महाविद्यालातील मराठी विभागाचा

## सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING(MOU)

मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले.

हे कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात ग्रामीण विभागात आहे. हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी सलग्न असून येथे कला, वाणिज्य व विज्ञान या शाखा आहेत. या महाविद्यालयाद्वारे सातत्याने साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

वर नमूद केलेल्या आपल्या श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय,इचलकरंजी आणि मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले. या महाविद्यालयांच्या मराठी विभागाचा एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि.०१ एप्रिल २०२२ रोजी करत आहेत. सदर कराराद्वारे उभय संस्थांच्या सहयोगाने पूर्ण करावयाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली आहेत.

उद्दिष्टये

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे, तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. मराठी विषयाचे विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम यासाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजूषा, कथालेखन, काव्यलेखन, अभिवाचन, पुस्तक परीक्षण, काव्यवाचन, कथाकथन आदी स्पर्धांचे आयोजन करणे.

५. महाविद्यालयातील स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्राला मराठीभाषा व साहित्य या विषयाच्या तयारीसाठी सहकार्य करणे.

६. विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, भाषिक कौशल्ये विकास प्रकल्प राबविणे.

CamScanner

७. प्राध्यापक, विद्यार्थी, नवोदित लेखक यांच्यासाठी सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन या संदर्भी प्रकल्प राबविणे.

८. महाविद्यालयात मोडीलिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता, व्यक्तिमत्व विकास व भाषिक कौशल्य इ. अभ्यासक्रमांचे सर्टिफिकेट कोर्स चे आयोजन करणे.

०९. प्राध्यापक व विद्यार्थी यांचे ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचा प्रकाशन समारंभ तसेच ग्रंथ चर्चा घडवून आणणे.

१०. मराठी भाषा संवर्धन तसेच भाषिक विकास याअनुशंगाने इतर सर्व कार्यक्रमात एकमेकांस सहकार्य करणे.

एकमेकांना साहाय्य करण्याची प्रस्तावित कार्यपद्धती

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणांमध्ये सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधन सामुग्रीनुसार उभय संस्थाद्वारे एक निश्चित योजना तयार करून अंमलबजावणी करणे.

अटी

१. प्रत्येक उपक्रमांसाठी दोन्ही संस्था स्वत:चा खर्च स्वत: उचलतील.
२. या सामंजस्यकरारातील उद्दिष्ट्ये व कार्यपद्धतीबाबतच्या कलमांचे उल्लघंन होत असल्याचे आढळल्यास हा करार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेद्वारे कधीही संपुष्टात आणला जावू शकतो.किंवा ६० दिवसांच्या लेखी पूर्वसूचनेने हा करार दोन्हींपैकी कोणत्याही संस्थेला रद्द करता येईल.
४. सदर परस्परसामंजस्य कराराचा कालावधी ५ वर्षे राहील. परस्पर सहमतीने आणखी १० वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता उभय संस्थांवर बंधनकारक असेल.

समन्वय

१. सदर कराराच्या पुर्ततेची जवाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणी साठी दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य आणि मराठी विभागाचे प्रमुख जबाबदार राहतील. कार्यपूर्ती संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, मराठी विभागप्रमुख आणि समन्वयक काम करतील.
२. सदर सामंजस्य करार उपरोक्त उद्दिष्ट्ये, कार्यपद्धती व अटींच्या अधीन राहून अंमलात येत आहेत. त्याचेअ भिलेख दोन्ही संस्थाकडे सहीशिक्क्यानिशी जतन राहतील.
३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे. तो दि. ०१ एप्रिल २०२२ पासूनपुढील १० वर्षासाठी अमलात येत आहे.

| डॉ. सुभाष जाधव | डॉ. अनिल पाटील | डॉ.अमर कांबळे | डॉ.एकनाथ पाटील | डॉ.योजना जुगळे |
|---|---|---|---|---|
| विभाग प्रमुख | प्राचार्य | समन्वयक | विभाग प्रमुख | प्राचार्या |

श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील ...